

**डॉ. आर. के. शानेदिवाण**

**प्राचार्य**

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाची स्थापना 1971 साली झाली. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून व्यवस्थापनाने निश्चित ध्येय आणि धोरणांचा अंगीकार करीत शैक्षणिक व प्रशासनीक वाटचाल केली आहे. महाविद्यालयाच्या उभारणीमध्ये तत्कालीन आमदार कै. श्रीपतराव बोंद्रे (दादा) यांच्या विचारांचा प्रभाव महत्त्वपूर्ण ठरला. त्यांनी कोल्हापूरच्या सार्वजनिक जीवनात आपल्या विशिष्ट मनोधारणेच्या आधारे आदराचे स्थान प्राप्त केले होते. लौकिकदृष्ट्या राजकारणामध्ये सक्रिय असणाऱ्या दादांनी  महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, वि. रा. शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक यांच्या समाजविधायक विचारांचा वसा आणि वारसा जपला. राजकारणाचा पाया समाजकारण असायला हवा ही भूमिका मनात बाळगणाऱ्या कै. दादांनी शिक्षणाचा प्रसार व सार्वत्रिकीकरण या बाबींना विशेष प्राधान्य दिले. त्यामुळे श्री शहाजी महाविद्यालयाच्या सुरूवातीपासून  सर्वांसाठी शिक्षण  हीच भूमिका जोपासण्यात आली.

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाची वाटचाल पन्नासाव्या वर्षाकडे सुरू आहे. या दीर्घ कालावधीत कनिष्ठ, वरिष्ठ व पदव्युत्तर स्तरावरील शिक्षण प्रक्रिया विद्यार्थीसन्मुख बनविण्याचे विविधांगी प्रयोग सातत्याने होत आहेत. सध्याच्या काळात पारंपरिक शिक्षण व्यवस्थेमध्ये आमुलाग्र बदल होत असून जागतिकीकरणाचा प्रभाव स्पष्टपणे जाणवत आहे. नवनव्या विद्याशाखांसह कौशल्याधारित व्यावसायिक शिक्षण प्रक्रिया राबवण्यास प्राधान्य मिळत आहे. एकाअर्थी विद्यार्थी मनाने आणि विचाराने स्वयंपूर्ण बनावा अशी धडपड सुरू असून कला, वाणिज्य, शास्त्र यांसह शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ निरंतर अध्ययन केंद्राचे आठ वेगवेगळे कोर्स सुरू आहेत. त्याचबरोबर मुलींच्या सर्वांगीण विकासाचा हेतू नजरेसमोर ठेवून वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येतात. यामध्ये शिवण, मूर्तीकाम, गीतगायन, नृत्य, फॅशन डिझायनिंग, पाकशास्त्र आदिंचा समावेश आहे. महाविद्यालयातून पदवी स्तराचा टप्पा पार केलेल्या विद्यार्थ्याने पदवीसह विविध क्षेत्रात कौशल्य प्राप्त करावे ही भूमिका गांभीर्याने विचारात घेऊन अध्ययन प्रक्रिया राबवण्यात येते. आमचे महाविद्यालय शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने शहराच्या जवळ असणाऱ्या खेड्यांतील मुलांमुलींसाठी महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र बनले. कै. दादांच्या नैतिक आचरणाचा दरारा व सार्वजनिक जीवनातील आश्वासक वावर यांमुळे महाविद्यालयाचा परिसर सर्वार्थाने सुरक्षित राहिला आहे. विशेषत: खेड्यापाड्यातील मुली निर्भयपणे शिक्षणाच्या प्रक्रियेत सहभागी होत आहेत ही बाब संस्था व महाविद्यालयाच्या विश्वासार्हतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.

आधुनिक काळात शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये माजी विद्यार्थ्यांचा सहभाग आणि योगदान महत्त्वाचे ठरत आहे. आमच्या महाविद्यालयाला माजी विद्यार्थ्यांची समृद्ध परंपरा लाभलेली असून

गेल्या चाळीस वर्षामध्ये सार्वजनिक जीवनातील वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नावलौकिक प्राप्त केला आहे. यामध्ये राजकीय क्षेत्रातील महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री आमदार अजित पवार, माजी आमदार काकासाहेब पाटील, प्रशासन सेवेतील श्री. ज्ञानेश्वर मुळे, भूषण गगराणी, विलास पाटील यांच्यासह सांस्कृतिक, कला, क्रिडा या क्षेत्रांशी निगडित असणाऱ्या अनेक माजी विद्यार्थ्यांनी आमच्या महाविद्यालयाचा लौकिक वाढविला असून या सर्वांना एकत्रित आणण्याच्या दृष्टीने शहाजी माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली आहे.

कोल्हापूर शहरामध्ये श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचा लौकिक अनेकांगानी आहे. विशेषत: येथील विद्यार्थी शिस्तप्रिय, अभ्यासू असून संस्थेच्या ध्येय, धोरणांचे पालन करणारा आहे. त्यामुळे गुणवत्तेसह चांगला भारतीय नागरीक बनण्याविषयीची सजग जाणीव त्यांच्या मनात सातत्याने असते. ही जाणीव सकारात्मक दिशेने कार्यरत रहावी, आणि विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात कौशल्य प्राप्त करण्यासाठी आपल्यातील उर्जा उपयोगात आणावी या दिशेने सातत्यपूर्ण प्रयत्न व प्रेरणा देण्याची जबाबदारी संस्था व महाविद्यालयाच्या सर्व घटकांनी स्वीकारली असल्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

कोणतीही व्यवस्था उर्जितावस्थेत यायची असेल तर नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीकडे भविष्यवेधी दृष्टी आणि समाजाला सकारात्मक दिशेने पुढे नेण्यासाठीची धोरणे असावी लागतात. आमच्या श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे नेतृत्व करणारी सर्व मान्यवर समाजाशी घट्ट नाळ असणारी होती. विशेषत: शिक्षणासंदर्भात त्यांच्या मनात अपार कळवळा होता. सद्यस्थितीत संस्थेच्या माध्यमातून वेगवेगळ्या विद्याशाखांतून चार हजाराहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आज विस्तारलेल्या या संकुलाला दीर्घकाळ कै. श्रीपतराव बोंद्रेदादा यांचे नेतृत्व लाभले. त्यांनी गोरगरीब मुलामुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देताना विद्यार्थी केवळ परीक्षार्थी न राहाता चांगला नागरीक, चांगला माणूस बनायला हवा या दृष्टीने प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे श्री शाहू शिक्षण संस्था व श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचा लौकिक शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रामध्ये कायम आहे. आज कै. श्रीपतराव बोंद्रे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी विद्यमान चेअरमन श्री. मानसिंग विजयराव बोंद्रे व मानद सचिव श्री. विजयराव श्रीपतराव बोंद्रे यांच्या खांद्यावर असून त्यांच्या कल्पक नेतृत्वाने या संकुलाचा चेहरामोहरा गुणात्मक स्तरावर विस्तारत असून संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, पालक, माजी विद्यार्थी या सर्वांचे सकारात्मक योगदान महत्त्वपूर्ण आहे.